
ePaper **भाजपच्या कार्यकर्त्याला मारहाण प्रकरणी कुख्यात गुंड गजा मारणेला अटक**



| वर्ष - 8 | अंक - 220 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 25 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- रचिन रवींद्रचा शतकासह वर्ल्ड रेकॉर्ड!
- युपीचा सुपर ओव्हरमध्ये थरारक विजय
- एआय विविध क्षेत्रातील नोकऱ्या खाणार?
- गोऱ्हेंनी केलेलं वक्तव्य मूर्खपणाचं

## आता उद्धवची पाळी, राज देतोय टाळी !

# उद्धव - राज भेट, राजकीय चर्चा थेट !

## भाऊबंदकी, संशयकल्लोळ संपणार... रेशीमगाठी कधी?



। मुंबई । महाईन्यूज

शिवसेना 'उबाठा' गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी एकत्र आले.. त्यांच्यात थोडीशी चर्चा, थोडेसे हास्यविनोद झाले..त्यामुळे राजकीय वर्तुळात मात्र एकच खळबळ उडाली आहे. ठाकरे बंधू एकत्र येण्याचा हा गेल्या सहा महिन्यातील तिसरा योग आहे.



ठाकरे बंधूंनी एकत्र यावे आणि राजकारण करावे, वंदनीय बाळासाहेबांचा शिवसैनिक त्यांच्या पाठीशी ठाम उभा राहील, अशा आशयांचे अनेक फलक पुण्या-मुंबईत झळकले आहेत. त्यामुळे, या दोघांनी एकत्र यावे, यासाठी काही ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्तेही प्रयत्न करू लागले आहेत. विशेषतः, मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीपूर्वी दोघे एकत्र आले, तर त्याचा राजकीयदृष्ट्या निश्चित फायदा होईल, असेही ठोकताळे मांडले जात आहेत.

### विधानसभेत दोघांचाही सुपडा साफ

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही ठाकरेंच्या पक्षांचा सुपडा साफ झाला. उद्धव हे 'महाविकास आघाडी' चे एक घटक होते, पण संपूर्ण आघाडीच यावेळी अपयशी ठरली, पण, उद्धव यांचे चिरंजीव आदित्य हे मात्र विजयी झाले. दुसरीकडे, राज ठाकरे यांनी सवता सुभा मांडून आपल्या पक्षाचे नशीब आजमावले होते. त्यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांना या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला होता.

### भाजपाकडून गाजर पेरणी

सत्ताधारी 'महायुती' मधील भारतीय जनता पार्टी कडून राज ठाकरे यांना नेहमीच 'युती' मध्ये येण्याचे आमंत्रण दिले जाते. भाजपाचे नेतेच काय, पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी देखील राज ठाकरे यांची अनेकदा चर्चाही झाली आहे, पण 'घरगुती भेट' असे म्हणून 'मूळ मुद्द्या' ला नेहमीच बगल दिली गेली आहे.

### फडणवीस-उद्धव-आदित्य भेट

गेल्या काही दिवसात 'या ना त्या' कारणावरून देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे तसेच आदित्य ठाकरे यांनी भेट घेऊन चर्चा केली आहे. 'सदिच्छा भेट' असे गोंडस नाव दिले गेले असले तरी त्यामागील गौडबंगाल मात्र कायम आहे.

### आपण दोघे भाऊ..थोडं भविष्याचंही पाहू !

उद्धव आणि राज यांच्या भेटीबद्दल राजकीय वर्तुळात चर्चा उमटली नसती तरच नवल! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की महाराष्ट्राच्या राजकारणात संवाद हा झालाच पाहिजे.कोणामध्येही विसवाद नसावा. शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी स्पष्ट केले, की ते दोघे भाऊ आहेत.. भाऊ भावाला केव्हाही भेटू शकतो आणि चर्चा करू शकतो, त्यांना शुभेच्छा आहेत. या समारंभातील भेटीच्या वेळी रश्मी उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंचे स्वागत केले, आणि काही काळ त्यांच्याशी मनमोकळ्या तसेच दिलखुलास गप्पा मारतानाही त्या दिसल्या. भेटीचे निमित्त होते कौटुंबिक.. चर्चा मात्र राजकीय !

### मुंबईतला मराठी माणूस आणि मते

शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईतील मराठी माणसाला डोळ्यासमोर ठेवून शिवसेनेची उभारणी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आधी राज ठाकरे 'तयार' झाले, आणि नंतर ही संघटना उद्धव ठाकरे यांच्या ताब्यात गेल्याने राज ठाकरे बाहेर पडून त्यांनी स्वतंत्र पक्ष उभा केला. पण, आता दोघेही अपयशी ठरत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. म्हणूनच, दोघांनी एकत्र यावे, अशी मराठी माणसाची इच्छा आहे आणि कदाचित तसे घडल्यास मुंबई महानगरपालिकेत त्यांना यश देखील मिळू शकते, असे राजकीय निरीक्षकांना वाटते.

### गेल्या तीन महिन्यातील भेटी

**15 डिसेंबर 2024**
मुंबईतील ताज लँड्स एन्ड या हॉटेलमध्ये राज ठाकरे यांनी रश्मी ठाकरे यांचे बंधू श्रीधर पाटणकर यांचा मुलगा शौनक पाटणकर यांच्या लग्नात हजेरी लावली होती.

**22 डिसेंबर 2024**
मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची बहीण जयवंती ठाकरे-देशपांडे यांच्या मुलाच्या लग्नात एकत्र आले होते. दादरमधील राजे शिवाजी विद्यालयात हे लग्न लागले. या लग्नाच्या निमित्ताने ठाकरे कुटुंब एकत्र आले होते.

**23 फेब्रुवारी 2025**
शासकीय अधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मुलाच्या लग्नात अंधेरी येथे भेट आणि मन मोकळ्या गप्पा.

# रवींद्र धंगेकरांना उदय सामंतांनी दिली ऑफर

## धंगेकर कालही काँग्रेसबरोबर होते आणि आजही आहेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्याबाबत गेल्या काही दिवसांपासून पक्ष सोडणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. यातच दोन दिवसांपूर्वी रवींद्र धंगेकर यांनी एक व्हॉट्सअॅप स्टेट्स ठेवलं होतं. त्यांच्या व्हॉट्सअॅप स्टेट्समधील फोटोत त्यांनी गळ्यात भगवं उपरणं परिधान केल्याचं पाहायला मिळालं.**



असे सवाल अनेकांनी उपस्थित केले. रवींद्र धंगेकर यांनी ठेवलेल्या स्टेट्समुळे ते काँग्रेसला सोडचिठ्ठी देणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.या संदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाष्य केलं आहे. माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्याबाबत सुरु असलेल्या चर्चांसंदर्भात हर्षवर्धन सपकाळ यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना ते म्हणाले की, “रवींद्र धंगेकर हे कालही काँग्रेसबरोबर होते आणि आजही आहेत”, अशी एका वाक्यात हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया दिली.माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी त्यांच्या स्टेट्सला गळ्यात भगवं उपरणं घातलेला एक फोटो ठेवला होता. त्या फोटोवर स्टेट्सला ‘तेरे क़दमों के तले मिट्टी भी सोना बन गयी, जर हुआ दुश्मन जहाँ शमशीर तेरी तन गयी...’ हे गाणे ठेवल्याचं पाहायला मिळालं होतं. त्यानंतर त्यांचं हे स्टेट्स सोशल मीडियावर व्हायरल झालं होतं आणि त्यानंतर ते शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा रंगल्या.शिवसेना पक्षाचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना रवींद्र धंगेकर यांच्याबाबत सूचक विधान केलं होतं. ते म्हणाले होते की,“रवींद्र धंगेकर यांनी गळ्यात भगवं उपरणं परिधान केलेला फोटो व्हॉट्सअॅप स्टेट्सला ठेवला होतं असं मी पाहिलं. त्याबाबत मी बोललो की त्यावर धनुष्यबाण आला तर आम्हाला आवडेल. तसेच मी रवींद्र धंगेकर यांना निमंत्रण दिलं आहे.

### धंगेकर आणि शिंदेंच्या भेटीची चर्चा

कारण त्यांच्या सारख्या सर्वसामान्य एका कार्यकर्त्याला जर ताकदीने काम करायचं असेल आणि सामाजिक क्षेत्रात काम करायचं असेल तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशिवाय पर्याय नाही”, असं उदय सामंत यांनी म्हटलं होतं.काही दिवसांपूर्वी रवींद्र धंगेकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली होती. रवींद्र धंगेकर यांनी अचानक घेतलेल्या या भेटीमुळे चर्चांना उधाण आलं होतं. मात्र, त्यानंतर या भेटीबाबत स्पष्टीकरण देताना आपण वैयक्तिक कामाच्या संदर्भात भेट घेतल्याचं स्पष्टीकरण रवींद्र धंगेकर यांनी दिलं होतं. “माझ्या वैयक्तिक कामासाठी मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर मी त्यांना माझ्या वैयक्तिक कामाचं स्वरुप सांगितलं, तेव्हा ते काम करून देतो बोलले. त्यांच्याकडे काम असल्यामुळे मला त्यांना भेटण्याची गरज पडली”, असं रवींद्र धंगेकर तेव्हा म्हणाले होते.

# चित्रपटांतून समाजभान निर्माण होण्याची गरज

## समाजाशी नाळ टिकवून ठेवणे गरजेचे : प्रवीण तरडे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नाहीत. चित्रपटांतून समाजभान निर्माण व्हायला हवे, असे मत लेखक दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी मांडले. श्री महर्षी व्यास प्रतिष्ठानतर्फे श्री महर्षी व्यास पुरस्कार भारत विकास ग्रुपचे (बीव्हीजी) हनुमंतराव गायकवाड, लालबागच्या राजाचे मूर्तिकार संतोष कांबळी यांना तर चित्रपट निर्माते राम डवरी कलागौरव पुरस्कार दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेत्री स्मिता गोंदकर यांना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**



### चांगल्या घटकांना समोर आणायला हवे

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह येथे हा कार्यक्रम झाला. भिक्षेकऱ्यांपर्यंत मोफत औषधोपचार पोहचवणारे सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभिजित सोनावणे यांना श्री महर्षी व्यास विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर डवरी, विश्वस्त संजय साष्टे, संजय कपिले, रामचंद्र मोरे आदी या वेळी उपस्थित होते.तरडे म्हणाले, ‘प्रत्येकानेच समाजाशी नाळ टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्यातल्या चांगल्या घटकांना समोर आणायला हवे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह येथे हा कार्यक्रम झाला. भिक्षेकऱ्यांपर्यंत मोफत औषधोपचार पोहचवणारे सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभिजित सोनावणे यांना श्री महर्षी व्यास विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर डवरी, विश्वस्त संजय साष्टे, संजय कपिले, रामचंद्र मोरे आदी या वेळी उपस्थित होते.तरडे म्हणाले, ‘प्रत्येकानेच समाजाशी नाळ टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्यातल्या चांगल्या घटकांना समोर आणायला हवे. शेतकऱ्यांचा तालुका असलेला मुळशी तालुका गुन्हेगारांचा तालुका म्हणून ओळखला जात होता. मात्र, अनेक मोठी माणसे या तालुक्याने दिली आहेत. त्यामुळे गुन्हेगारांचा तालुका ही ओळख आता पुसली जाईल. शेतकरी हा अन्नदाता आहे. त्यांचे प्रश्न समजून घ्यायला हवेत.डॉ. सोनावणे यांनी आपल्या कामाविषयी माहिती दिली. तसेच माणसाने व्यक्तिगत स्वार्थाच्या पलीकडे जाऊन समाजासाठी योगदान द्यायला हवे, अशी भावना व्यक्त केली.चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नाहीत.

चित्रपटांतून समाजभान निर्माण व्हायला हवे, असे मत लेखक दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी मांडले. श्री महर्षी व्यास प्रतिष्ठानतर्फे श्री महर्षी व्यास पुरस्कार भारत विकास ग्रुपचे (बीव्हीजी) हनुमंतराव गायकवाड, लालबागच्या राजाचे मूर्तिकार संतोष कांबळी यांना तर चित्रपट निर्माते राम डवरी कलागौरव पुरस्कार दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेत्री स्मिता गोंदकर यांना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# रस्त्यावर चालणारा प्रत्येक जण गुन्हेगार नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

‘रस्त्यावर चालणारा प्रत्येक जण गुन्हेगार नाही. वाहतूक पोलिसांनी नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करावी. मात्र, कारवाई करताना वादाचे प्रसंग टाळावेत. नागरिकांशी सौजन्याने वागावे’, असे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी दिले. मुंबईच्या धर्तीवर पुणे पोलीस दलात वाहतूक शाखेत काम करणाऱ्या पोलिसांसाठी प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. पुणे श्रमिक पत्रकार संघाकडून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव उपस्थित होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, ‘पुणे शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. महापालिका, तसेच विविध शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून वाहतूक विषय सुधारणा करण्यात येत आहेत. पुणे शहरात विविध वाहतूक विषयक कामे, तसेच पायाभूत सुविधांसाठी पोलिसांना एक हजार कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला.नवीन भरती प्रक्रियेतील .८०० पोलीस कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले. अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी ४३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन देण्यात आला आहे. नवीन सात पोलीस ठाण्याचे उद्घाटन करण्यात आले. वाहतूक शाखा म्हणजे पुणे पोलिसांचा जनसंपर्क कक्ष आहे. रस्त्यावरून जाणारा वाहनचालक किंवा नागरिक गुन्हेगार नाही. याची जाणीव पोलिसांनी ठेवावी. कारवाई करताना वादाचे प्रसंग टाळावेत. नागरिकांशी सौजन्याने वागावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.’मुंबई पोलीस दलात वाहतूक शाखेत नियुक्ती होण्यापूर्वी पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते. पुण्यातही वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी पोलीस दलांतर्गत संस्था सुरू करण्यात येणार आहे.

# फिट राहा, आनंदी राहा!

## ‘हॅप्पीनेस स्ट्रीट’ : माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड: माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांनी पिंपरी येथे ‘हॅप्पीनेस स्ट्रीट’ हा उपक्रम राबविला आहे. सदर उपक्रम २९ डिसेंबर २०२४ ते २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दर रविवारी पिंपरी येथील ओपन लॉन येथे राबविल गेला. ‘फिट राहा, आनंदी राहा व संपर्कात राहा, असा संदेश देत हा उपक्रम संपूर्ण करण्यात आला.**



या उपक्रमाबाबत बोलताना डब्बू आसवानी म्हणाले की, लहान मुलांसह वयस्कर व्यक्तींनी आनंदी राहावे, विविध खेळाचा आनंद घ्यावा, याकरिता या हॅप्पीनेस स्ट्रीट उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमात लहान मुलांसाठी व युवक-युवतींसाठी तसेच वयोवृद्ध व्यक्तींसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. मनुष्याचे जीवन निरोगी राहण्यासाठी, आयुष्यात खेळांचा समावेश असणे आवश्यक असते. लहान-मोठे वृद्ध सर्वांच्याच जीवनात विविध खेळाचे अनन्य साधारण महत्व असते, आणि यामुळेच पिंपरीमध्ये ‘हॅप्पीनेस स्ट्रीट’ नावाचे उपक्रम राबवित आहोत. या उपक्रमाच्या अंतर्गत ४० विविध खेळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या उपक्रमात सर्व वयोगटातील नागरिकांचा सहभाग पाहावयास मिळत आहे. योगा, झुंबा, लाईव्ह म्युझिक, डान्स, ड्रम, लाईव्ह शो, तसेच विविध खेळांच्या स्पर्धा यामध्ये केरम, बुद्धिबळ, रनिंग, सायकलिंग, जॅमर्स बोवलिंग असे अनेकोनेक उपक्रम या हॅप्पीनेस स्ट्रीट अंतर्गत राबविले. ‘WALKATHON’ साठी जमा जालेले डोनेशन रक्कम हि जे.एमडी ग्रुप, सोफोश चाइल्ड आश्रम, अपंग आश्रम पुणे या तिन्ही संस्थाना प्रति ५० हजार रुपायचे चेक देण्यात आले. सदर उपक्रम राबवत असताना अविनाश इसरानी, पवन भोजवानी, सुरज धरयानानी, मनीष गिरजा, मित्र परिवार तसेच प्रिशा स्कूल मेंबर, जीन मधु जुमानी, शोभा फिटनेस क्लास, गीतुज फिटनेस क्लब, लेट लूज झुंबा पलक अहुजा, टीम डान्ससेशन बाय हितेश आणि कशिश, जीन हरीश गुले, नित्या फिटनेस, विनोद डान्स अकादमी लिशा फिटनेस, किरण योगा ग्रुप, डान्स हूड बाय मेहक, जे,एमडी ग्रुप व इतर सर्व यांच्या सहकार्याने सदर उपक्रम खूप उत्सहात पार पडला.

### ‘WALKATHON’ साठी 1470 रजिस्ट्रेशन

तसेच दि.२३ फेबुवारी २०२५ रोजी या उपक्रमाचा शेवटचा रविवार होता. त्या अनुषंगाने पिंपरीनगरमध्ये ३ किमी चे ‘WALKATHON’ चे आयोजन केले होते. ‘WALKATHON’ साठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन ठेवले गेले होते. तसेच रजिस्ट्रेशनसाठी ९९ रुपये फी आकारण्यात आली होती. सदर ‘WALKATHON’ साठी एकूण १४७० नागरिकांचे रजिस्ट्रेशन झाले होते. रजिस्ट्रेशन केलेल्या सर्व नागरिकांना जर्सी तसेच ‘WALKATHON’ पूर्ण झाल्यानंतर मेडल देण्यात आले. पिंपरी चिंचवड शहर डीसीपी भास्कर ढेरे साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष योगेश बहल, परमानंद जमतानी, माजी नगरसेवक हरेश आसवानी यांच्या उपस्थितीत ‘WALKATHON’ ची सुरवात झाली.

---

# महापालिकेच्या सेवांचा लाभ आता एका ‘क्लिक’वर!

## मालमत्ता हस्तांतरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र यासह विविध सेवा डिजिटल

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र यासह विविध सेवांचा लाभ आता शहरातील नागरिकांना घरबसल्या घेता येणार आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाले असून महापालिकेच्या सर्व सेवांचा लाभ एका क्लिकवर नागरिकांना उपलब्ध होणार आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य यांच्यातील डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ता हस्तांतरण ऑनलाइन पद्धतीने शक्य झाले आहे. मालमत्ता खरेदीदारांना आता मालमत्ता हस्तांतरणासाठी महानगरपालिकेत स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच नाव हस्तांतरणाची प्रक्रिया जलद झाली असून ती एका दिवसात पूर्ण होणार आहे. याशिवाय मालमत्तेच्या वापरातील निवासी ते व्यावसायिक अशा स्वरुपाचा कोणताही बदल महानगरपालिकेच्या रेकॉर्डमध्ये स्वयंचलितपणे अपडेट करणे शक्य होणार आहे.

### विवाह प्रमाणपत्र मिळणार एका क्लिकवर


पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विवाह नोंदणी प्रणाली डिजीलॉकरसोबत यशस्वीरित्या जोडण्यात आली आहे. त्यामुळे रहिवाशांना त्यांचे विवाह प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. पहिल्या टप्प्यात २०१४ पासून जारी करण्यात आलेले प्रमाणपत्रे आता डिजीटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

> “ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे आता नागरिकांना महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या सेवा अधिक सुलभपणे देणे शक्य होणार आहे. नागरिकांना जलद आणि अधिक कार्यक्षम प्रशासनाचा अनुभव देता यावा, यासाठी महानगरपालिकेने टाकलेले हा महत्त्वाचे पाऊल आहे.
>
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक.

### आपले सरकार पोर्टलवर विविध सेवा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या काही सेवा प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्र सरकारच्या आपले सरकार पोर्टलवर देखील उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे नागरिकांना महानगरपालिका कार्यालयांना भेट न देत आवश्यक सेवांचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने उद्योगधंदा परवाना, जलनिसरण जोडणी, अग्निशमन विभागाची एनओसी अशा सेवांचा समावेश आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भक्त आणि परमात्मा एकरूपच असतात

'आमच्या हातून वारंवार चुका होतात' असे तुम्ही म्हणता. लहान मुलगा चालताना अडखळतो, पडतो किंवा बोलताना बोबडे बोलतो त्याचे आईबापांना कौतुकच वाटते. त्याचप्रमाणे तुमच्या चुकांचे मला कौतुक वाटते. चुका सावरण्याच्या तुमच्या प्रयत्नांचेही तसेच कौतुक वाटते. म्हणून त्याबद्दल तुम्ही काहीही मनात आणण्याचे कारण नाही. गुरूने एकदा सांगितले की, 'तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस' तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषधच आहे. नामाचे हे औषध सतत थेंब थेंब पोटात गेले पाहिजे. ऑफिसमध्येसुद्धा ते आपण बरोबर घेऊन जावे. विद्वान्, अडाणी, श्रीमंत, गरीब सर्वांना हे औषध सारखेच आहे. जो पथ्य सांभाळून हे औषध घेईल त्याला गुण लवकर येईल.

एखादा मुलगा 'मी विहिरीत उडी घेणार' म्हणून हट्ट धरून बसला तर बापाने त्याचा हा हट्ट पुरवायचा का त्याला समजावून किंवा तोंडात मारून तिथून बाजूला काढायचे ? त्याप्रमाणे तुमचे विषय मागण्याचे हट्ट आहेत. खरा भक्त कधीही दुःखी-कष्टी असत नाही, आपल्या समाधानात असतो; मग तो कितीही दरिद्री किंवा व्याधिग्रस्त असेना ! अमुक एक हवे ते मिळाले नाही म्हणजे सामान्य माणसाला दुःख होते. भक्ताला कसलीही आस नसते, त्यामुळे त्याला दुःख नसते. तो आणि परमात्मा एकरूपच असतात. परमात्म्याची इच्छा हीच त्याची इच्छा असते. सगुणाची भक्ती करता करता त्याला 'मी' चा विसर पडत जातो. 'मी नसून तूच आहेस' ही भावना दृढ होत जाते. शेवटी 'मी' नाहीसा झाला की राम, कृष्ण, वगैरेही नाहीसे होतात आणि परमात्मा तेवढा शिल्लक उरतो.

आजारामधून उठलेल्या अशक्त माणसाने जसे काठीच्या आधाराने चालावे, त्याप्रमाणे प्रांपचिकाने सगुणभक्तीने तरून जावे. देहबुद्धी असणाऱ्या माणसाला सगुणावाचून भक्तीच करता येणार नाही. भगवंताला आपण सांगावे की, 'भगवंता, तुझी कृपा मजवर असू दे; आणि कृपा म्हणजे, तुझे स्मरण मला अखंड राहू दे.' यातूनच त्याची भक्ती उत्पन्न होईल. भगवंतावाचून कशातही समाधान नाही. त्याच्याशिवाय जगण्यात आनंद नाही. जो भगवंताचा झाला, म्हणजे त्याच्या नामात राहिला, त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही.

बोधवचनः- परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावे.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# नीलमताईंचे शिंतोडे कसले?, 'मातोश्री' खाली जणू सुरुंगच!

**एका मुलाखतीमध्ये शिवसेनेच्या नेत्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' खाली जणू सुरुंगच लावला आहे. त्यांनी शिंतोडे उडवले किंवा त्याच स्वतः भ्रष्ट आहेत असे म्हणणाऱ्यांचे आता पेव फुटेल. पण, त्यांनी वर्मी बसणारा घाव घातला आहे. उद्धव ठाकरेंच्या गटाला रक्तबंबाळ करून टाकले आहे. कोणत्याही आणि कोणाच्याही खुलाशाचे मलम त्यावर आता इलाज करू शकत नाही!**



### दोन मर्सिडीज गाड्यांमध्ये सौदा

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी थेट आरोप केला आहे, की उद्धव ठाकरे यांच्या पक्षात दोन मर्सिडीज 'मातोश्री' वर पाठवल्या, की हवे ते पद मिळते, अगदी चौकशी न करता ते बहाल केले जाते. साहित्य संमेलनातील खुलेआम प्रकट मुलाखतीत कॅमेऱ्यासमोर त्यांनी केलेल्या आरोपामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजणे हे क्रमप्राप्तच आहे. किंबहुना खळबळ उडावी, म्हणूनच नीलमताईंनी हा थेट वार केला असावा.

### शिवसेनेचा इतिहासच देवाणघेवाणीचा

ज्यांनी शिवसेना जवळून पाहिली आहे, त्यांना हे असे आरोप नवीन नाहीत. शिवसेनेत आर्थिक देवाण-घेवाण जोरात चालते, हे प्रत्येक शिवसैनिकाला माहित आहे. यापूर्वी, अनेक वेळा अशा स्वरूपाचे आरोप प्रत्यारोप झाले. अगदी शाखाप्रमुख, नगरसेवकपदापासून ते खासदारकीपर्यंत उमेदवारी देताना पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'डील' होत असते, हे अगदी स्पष्टपणे नव्हे, पण डबक्या आवाजात अनेक जण सांगत असतात. आज हा मुद्दा नीलम ताईंनी उघडपणे मांडला असला तरी यापूर्वी शिवसेनेचे मंत्री नितेश राणे यांनी अनेकदा प्रश्न उपस्थित करून उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचा उत्पन्नाचा स्रोत काय, आणि ते अडीशे तीनशे कोटींचा बंगला कसा बांधू शकतात? हा प्रश्न उपस्थित केलेला आहेच. त्याला ठाकरे गटातील अनेकांनी दुजोरा सुद्धा दिला आहे.

### शिवसेनेत फूट पडली, वाभाडे सुरू..

पूर्वी शिवसेना एक होती त्यावेळी सर्व काही 'तेरी भी चूप,मेरी भी चूप' या न्यायाने सुरळीत सुरू होते. पण, एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडली आणि मोठा गट घेऊन ते बाहेर पडले. राज्याचे थेट मुख्यमंत्री झाले. त्यानंतर मात्र शिल्लक सेनेने त्यांच्यावर आरोप करण्याची एकही संधी सोडली नाही. पन्नास खोके, भ्रष्ट आमदार गेल्यामुळे शिवसेना स्वच्छ झाली असे आरोप केले. गंमत अशी की 'मातोश्री' बरोबर एकनिष्ठ असताना एकनाथ शिंदे हेच मोठ्या प्रमाणावर आर्थिक कमाई करून 'मातोश्री' पर्यंत पोहोचवत होते, असा आरोप किंवा ही माहिती प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात घर करून बसली आहे. आता या शिवसेनेच्याच नेत्या म्हणजे नीलमताई !

### ज्या घरच्या बोरी तेथीलच बाभळी !

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिल्लक सेना आणि एकनाथ शिंदे यांची 'ओरिजनल' शिवसेना यांच्यातच पदावरून आणि देवाण-घेवाणी वरून जुम्पल्यामुळे मूळ शिवसेना कशी असावी? याची कल्पना येऊ शकते. स्वतः नीलम ताई या उच्चशिक्षित आणि संविधानिक पदावर काम करत असल्यामुळे, त्या बेजबाबदार वक्तव्य कधीच करणार नाहीत. त्यामुळे, त्यांनी दोन मर्सिडीज चा विषय काढला.. अर्थात् त्यांनी म्हणताना दोन मर्सिडीज म्हटले असले तरी मोठी आर्थिक उलाढाल त्यांना अपेक्षित असावी! थोडक्यात काय, 'मातोश्री'वर पैसे पोहोचवले नाहीत तर पद मिळत नाही असे शब्द त्यांना उच्चाराचे असणार !

### शाखाप्रमुखाचा मोठा 'रेट'..

एक गोष्ट नक्की आहे की ज्याने शिवसेना जवळून पाहिली आहे, त्याला या पक्षाचे आर्थिक गणित नक्कीच माहित असणार. शाखाप्रमुख म्हणून नेमण्याचा अमुक अमुक रेट, नगरसेवकासाठी ही रक्कम, आमदारकीसाठी अपेक्षा आणि खासदारकीसाठी सर्वात मोठी रक्कम दिल्याशिवाय पद मिळत नाही, हा आरोप यापूर्वी अनेकांनी केलेला आहेच. नीलमताईंनी त्या जखमेवरील फक्त खपली काढली आहे, एवढा सध्याचा अर्थ!

### चारित्र्य हननासाठीच सर्व काही !

आता, नेहमीसारखा बेंडबाजा, शिवीगाळ, टोमणे आणि त्यांच्या अब्रूची लक्तरे बाहेर काढण्याचा एक कलमी कार्यक्रम सुरू होईल. वास्तविक, त्या ज्यावेळी मूळ शिवसेनेत होत्या, त्यावेळी तोंड बंद ठेवलेले सुद्धा आता चौफेर चारित्र्याचे ढोल बडवत बसतील. शिवसेनेतील त्यांची अनेक वर्षे, त्यांची आमदारकी सर्वांना मान्य होती. एवढेच काय एकनाथ शिंदे यांच्या पक्षात त्यांनी प्रवेश केला, त्यावेळी पण त्या चांगल्या होत्या. पण, आता त्यांनी केलेल्या आरोपाच्या मिरच्या उद्धव ठाकरे यांच्या गटाला चांगल्याच झोंबल्या आहेत, आणि त्याचा प्रतिकार म्हणून नीलमताईंच्यावर अगदी खालच्या थराचे आरोप सुरू झाले आहेत.

### राजकारणाचा थरच ढासळला !

उद्धव ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमक हरामी केली असा आरोप केला आहे, तर सुषमा अंधारे यांनी नीलम गोऱ्हे यांना चारदा आमदारकी मिळाली, तर किती पैसा गोळा केला,याचा हिशोब द्यावा, अशी मागणी केली आहे. नीलमताई आतापर्यंत शिवसेनेच्या उमेदवार म्हणून विधान परिषदेत चारदा निवडून गेल्या. आता त्या उपसभापती देखील झाल्या आहेत. त्यांनी आतापर्यंत 'मातोश्री' वर किती मर्सिडीज गाड्या पाठवल्या याचा हिशोब द्यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी केली आहे.

### काहीतरी तथ्य असणारच..

भाजपाचे गिरीश महाजन यांनी देखील नीलमताई म्हणतात म्हणजे या आरोपात तथ्य असावे, असा दावा केला आहे. दरम्यान, आपण चारदा आमदार झालो. मात्र एकदाही काहीही पैसा मातोश्रीला दिला नाही, असा दावा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे, हे पण लक्षात घ्यायला हवे ! मूळ शिवसेनेबाबत नीलमताई यांनी जो आरोप केला, त्याबाबत इतरही अनेक शिवसैनिकांकडून कधी ना कधी, काही ना काही कानावर आले आहे. मात्र, हे फक्त शिवसेनेतच नाही, तर सर्वच राजकीय पक्षांमध्ये कमी जास्त प्रमाणात आहे, हे मान्य करायलाच हवे. राज्यपाल नियुक्त 12 आमदारांची यादी ज्यावेळी पुढे गेली, त्यावेळी काँग्रेसच्या इच्छुकांकडून अनुक्रमे बाळासाहेब थोरात आणि अशोक चव्हाण यांनी प्रत्येकी पाच कोटी रुपये घेतल्याचे पत्र, त्या इच्छुकांनी थेट राज्यपालांना दिले होते, हा इतिहास ताताचा आहे.

### पदासाठी पैसे दिले, तर चारित्र्याचे काय?

मात्र, ये थे प्रश्न असा पडतो, की कोणीही कार्यकर्ता एखादे पद मिळवायला आर्थिक देवाणघेवाण करीत असेल तर अशावेळी पद मिळाल्यावर तो आपले स्वच्छ चारित्र्य जपू शकेल याची खात्री काय? जेव्हा एखादे पद मिळवायला तो मोठी रक्कम देणार असेल,तर त्याच्या पुढल्या कार्यकाळात तो ती रक्कम किमान पाचपटीने तरी वसूल करणारच..आज नीलमताई यांच्यासारख्या समाजवादी विचारसरणीतून पुढे आलेल्या एका कार्यकर्तीने परिणामांची पर्वा न करता असा बेधडक आरोप जाहीर मुलाखतीत करावा, ही बाब सर्वच राजकीय पक्षातील धुरिणांना विचार करायला लावणारी आहे, सर्वांच्याच डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी आहे. राजकारणातील हे विकृत स्वरूप आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडून थांबणार नाही, तर त्याला नैतिकतेची पेरणी करूनच नव्याने उभारणी घेणारे झाड लावावे लागेल, हे मात्र निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ओएसडी नेमण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचाच !

## माणिकराव कोकाटेंच्या विधानावर फडणवीसांची मोठी प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज एका कार्यक्रमात बोलताना एक मोठं विधान केलं. "आमचे पीएस आणि ओएसडी देखील मुख्यमंत्रीच ठरवत असल्यामुळे आमच्या हातात काही राहिलं नाही", असं म्हणत मंत्री माणिकराव कोकाटे यांनी एक प्रकारे नाराजीच व्यक्त केली. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. दरम्यान, यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी माणिकराव कोकाटे यांच्या विधानाच्या संदर्भात प्रश्न विचारला असता यावर देवेंद्र फडणवीस यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. "मंत्र्यांचे पीएस आणि ओएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांचाच आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितलं.**



### चुकीच्या नावाला मान्यता नाही

मंत्र्यांचे पीएस आणि ओएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांचाच आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितलं."माणिकराव कोकाटेंना हे माहिती नसेल की मंत्र्यांचे पीएस आणि ओएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांचाच आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्री मुख्यमंत्र्यांकडे पाठवत असतात. त्यावर मुख्यमंत्री अंतिम निर्णय घेत असतात. हे काही आता नव्याने होत नाही. मी मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्पष्टपणे सांगितलं होतं की तुम्हाला पाहिजे ती नावे पाठवा. पण त्या नावांमध्ये ज्यांची नावे फिक्सर म्हणून किंवा ज्यांची नावे चुकीच्या कामांमध्ये घेतले गेलेले आहेत त्यांना मी मान्यता देणार नाही", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

कोकाटेंना हे माहिती नसेल की मंत्र्यांचे पीएस आणि ओएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांचाच आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्री मुख्यमंत्र्यांकडे पाठवत असतात. त्यावर मुख्यमंत्री अंतिम निर्णय घेत असतात. हे काही आता नव्याने होत नाही. मी मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्पष्टपणे सांगितलं होतं की तुम्हाला पाहिजे ती नावे पाठवा. पण त्या नावांमध्ये ज्यांची नावे फिक्सर म्हणून किंवा ज्यांची नावे चुकीच्या कामांमध्ये घेतले गेलेले आहेत त्यांना मी मान्यता देणार नाही", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले."तसेच आतापर्यंत माझ्याकडे १२५ च्या जवळपास नावे आले आहेत. त्यातील मी १०९ नावे क्लिअर केली आहेत. राहिलेले नावे मी क्लिअर केलेली नाहीत. कारण कोणता न कोणता आरोप त्यांच्यावर आहे. तसेच कोणती न कोणती चौकशी त्यांच्यावर सुरु आहे. त्यामुळे कोणी नाराज झालं तरीही मी अशा नावांना मान्यता देणार नाही", असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. गेल्या काही दिवसांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या भेटी वाढल्या आहेत. याबाबत देवेंद्र फडणवीसांना विचारलं "या भेटीवर मी काही बोलू शकत नाही. पण राज्यात कोणीही कोणाशी सुसंवाद करत असेल तर मी त्याचं स्वागत करेन. आा पणही सर्वांनी ९ वाजताच्या भोंग्याला सुसंवाद कसा करावा हे शिकवलं तर राज्यातील संवादाची परिस्थिती सुधारेल", असा टोमणाही देवेंद्र फडणवीसांनी संजय राऊतांना लगावला. आता माझ्यासह तुमच्या कोणाच्या जाण्यामुळे सरकारवर काहीही परिणाम होणार नाही. त्यामुळे जास्त मस्ती कराल तर घरी जाल. विभागाचं काम शिस्तीत झालं पाहिजे. आम्हाला १०० दिवसांचा कार्यक्रम देखील दिला. आमचे पीएस आणि ओएसडी सुद्धा मुख्यमंत्रीच ठरवतात, हे देखील मी तुम्हाला सांगतो. त्यामुळे आमच्याही हातात काही राहिलं नाही. त्यामुळे आम्हाला नीट काम करावंच लागेल आणि तुम्हीही नीट काम करा, म्हणजे सरकारबरोबर आणि आपली चांगली सांगड बसली पाहिजे तर समाजात एकप्रकारचं स्थैर्य निर्माण होईल", असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज एका कार्यक्रमात बोलताना एक मोठं विधान केलं. "आमचे पीएस आणि ओएसडी देखील मुख्यमंत्रीच ठरवत असल्यामुळे आमच्या हातात काही राहिलं नाही", असं म्हणत मंत्री माणिकराव कोकाटे यांनी एक प्रकारे नाराजीच व्यक्त केली. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. दरम्यान, यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी माणिकराव कोकाटे यांच्या विधानाच्या संदर्भात प्रश्न विचारला असता यावर देवेंद्र फडणवीस यांनी सूचक प्रतिक्रिया दिली.

# महायुतीत विजयावरून श्रेयवादाची लढाई चालू

## सुरेश धसांच्या वक्तव्यानंतर शंभूराज देसाई कडाडले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देवेंद्र फडणवीसांच्या चेहऱ्याकडे पाहून मतदारांनी एकनाथ शिंदे यांचा बाण (धनुष्यबाण हे शिवसेनेचं निवडणूक चिन्ह) आणि अजित पवारांचं घड्याळ (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचं निवडणूक चिन्ह) निवडून दिल्याचं वक्तव्य भाजपा आमदार सुरेश धस यांनी केलं आहे. यावर आता शिवसेनेच्या शिंदे गटाने आक्षेप घेतला आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे की "चेहरा फडणवीसांचा असला तरी नेतृत्व हे एकनाथ शिंदे यांचंच होतं".**




### शिंदे यांनीच महायुतीचं नेतृत्व केलं

आम्ही ही निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढवली, त्यामुळे आजवर कुठल्याही पक्षाला किंवा आघाडीला मिळालं नव्हतं असं यश महायुतीला मिळालं"."नक्कीच निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांचा चेहरा होता. परंतु, ज्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने ही निवडणूक लढवली तो चेहरा म्हणजे एकनाथ शिंदे. तसेच एकनाथ शिंदे सातत्याने जनतेला सांगत आले की मी देवेंद्र फडणवीस व अजित पवार या दोघांना बरोबर घेऊनच काम करत आहे. ते नेहमी म्हणायचे की मी व माझे दोन्ही उपमुख्यमंत्री आम्ही तिघे मिळून सरकार चालवत आहोत. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनीच महायुतीचं नेतृत्व केलं आहे.

तर, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट म्हणाले, "आम्ही ही निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढवली, त्यामुळे आजवर कुठल्याही पक्षाला किंवा आघाडीला मिळालं नव्हतं असं यश महायुतीला मिळालं". सुरेश धस म्हणाले होते की "विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांचा चेहरा पाहून लोकांनी महायुतीला मतं दिली. 'हा इमानदार चेहरा आहे, यांच्या हाती महाराष्ट्र दिला पाहिजे', या प्रमुख भावनेतून लोकांनी आम्हाला निवडून दिलं. आमच्याबरोबर घड्याळ व धनुष्यबाणाला देखील निवडून दिलं. धसं यांच्या या वक्तव्यावर संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली आहे.संजय शिरसाट म्हणाले, "सुरेश धस यांनी त्यांच्या पक्षाबद्दल चांगलं बोलावं यात काही गैर नाही. परंतु, संपूर्ण महाराष्ट्र जाणतो की विधानसभा निवडणूक एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना महायुतीने त्यांच्या नेतृत्वाखाली लढवली होती. ही गोष्ट देवेंद्र फडणवीस व अजित पवार देखील मान्य करतील. यापूर्वी आमचं सरकार (एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील महायुतीचं सरकार) असताना एकनाथ शिंदे यांनी दिवसाचे २४ तास, आठवड्याचे सातही दिवस काम केलं. त्याला जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे यापूर्वी कधीही न घडलेलं या निवडणुकीत घडलं. प्रचंड

# नीलम गोऱ्हेंनी केलेलं वक्तव्य मूर्खपणाचं!

## नीलम गोऱ्हे यांनी ते वक्तव्य करायची गरज नव्हती : शरद पवार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**साहित्य संमेलनात झालेल्या एका मुलाखतीत नीलम गोऱ्हे यांनी एक भाष्य केलं त्या म्हणाल्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज दिल्या की एक पद मिळायचं. यावरुन चांगलाच वाद झाला. उद्धव ठाकरे यांनीही याबाबत प्रतिक्रिया देताना किती मर्सिडिज दिल्या ते त्यांनाच विचारा असं म्हटलं होतं. आता या सगळ्या प्रकरणावर माजी कृषी मंत्री आणि साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नीलम गोऱ्हे यांनी ते वक्तव्य करायची गरज नव्हती असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.**





२०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की संपर्क नको असेल नेत्यांना तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळतं. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचं सगळीकडे लक्ष होतं. नंतर अवनती होत गेली असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या होत्या. याबाबत शरद पवार यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.नीलम गोऱ्हे यांनी जे भाष्य साहित्य संमेलनात केलं त्याची काही आवश्यकता नव्हती. नीलम गोऱ्हे यांना चारवेळा आमदारकी मिळाली आहे. त्यांना या चारही टर्म कशा मिळाल्या या सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांनी मला वाटतं कुठल्याश्या कारचा उल्लेख केला तो करायला नको होता. नीलम गोऱ्हे यांनी असं बोलायला नको होतं. नीलम गोऱ्हे या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही होत्या. त्यानंतर त्या शिवसेनेत होत्या, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात त्या काम करत होत्या. त्यानंतर आता हल्ली त्या एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत काम करत आहेत. एका मर्यादित कालावधीत त्या जवळपास चार पक्षांचा अनुभव त्यांनी घेतला आहे. त्यांचा जो काही अनुभव लक्षात करायला त्यांनी ते भाष्य केलं नसतं तर योग्य ठरलं असतं. यासंबंधी संजय राऊत यांनी घेतलेली भूमिका योग्य आहे. संमेलनाचे जे आयोजक आहेत त्यांनीही नापसंती व्यक्त केली आहे. त्या सगळ्यावर आता पडदा टाकायला हरकत नाही.साहित्य संमेलनाचे जे पदाधिकारी आहेत त्यांनी माफी मागितली. त्यामुळे मी म्हटलं की पडदा टाका. संजय राऊत यांना माझ्यावरही जबाबदारी टाकायची असेल तर माझी तक्रार नाही कारण मी संमेलनाचा स्वागताध्यक्ष होतो. माझी संजय राऊत यांच्याबाबत काही तक्रार नाही. नीलम गोऱ्हे यांचं वक्तव्य मूर्खपणाचं होतं. यापेक्षा जास्त मी काहीही बोलणार नाही. असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.कुठल्याही कार्यकर्त्याला कमी लेखण्याचं काही कारण नाही. २०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की संपर्क नको असेल नेत्यांना तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळतं. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचं सगळीकडे लक्ष होतं. नंतर अवनती होत गेली असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या होत्या. याबाबत शरद पवार यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.नीलम गोऱ्हे यांनी जे भाष्य साहित्य संमेलनात केलं त्याची काही आवश्यकता नव्हती. नीलम गोऱ्हे यांना चारवेळा आमदारकी मिळाली आहे. त्यांना या चारही टर्म कशा मिळाल्या या सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांनी मला वाटतं कुठल्याश्या कारचा उल्लेख केला तो करायला नको होता. नीलम गोऱ्हे यांनी असं बोलायला नको होतं. नीलम गोऱ्हे या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही होत्या. त्यानंतर त्या शिवसेनेत होत्या, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात त्या काम करत होत्या. त्यानंतर आता हल्ली त्या एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत काम करत आहेत. एका मर्यादित कालावधीत त्या जवळपास चार पक्षांचा अनुभव त्यांनी घेतला आहे. त्यांचा जो काही अनुभव लक्षात करायला त्यांनी ते भाष्य केलं नसतं तर योग्य ठरलं असतं. यासंबंधी संजय राऊत यांनी घेतलेली भूमिका योग्य आहे. संमेलनाचे जे आयोजक आहेत त्यांनीही नापसंती व्यक्त केली आहे. त्या सगळ्यावर आता पडदा टाकायला हरकत नाही.साहित्य संमेलनाचे जे पदाधिकारी आहेत त्यांनी माफी मागितली. त्यामुळे मी म्हटलं की पडदा टाका. संजय राऊत यांना माझ्यावरही जबाबदारी टाकायची असेल तर माझी तक्रार नाही कारण मी संमेलनाचा स्वागताध्यक्ष होतो. माझी संजय राऊत यांच्याबाबत काही तक्रार नाही. नीलम गोऱ्हे यांचं वक्तव्य मूर्खपणाचं होतं.

### संमेलनात काही आवश्यकता नव्हती


यापेक्षा जास्त मी काहीही बोलणार नाही. असंही शरद पवार यांनी म्हटलं आहे.२०१२ वगैरे पर्यंत मी पाहात आले आहे की शिवाजी पार्क येथे होणाऱ्या सभा, मेळाव्यांना एकनाथ शिंदे यांचेच कार्यकर्ते गर्दी करायचे. दुसरा भाग असा की संपर्क नको असेल नेत्यांना तर तिथे आपण राहण्यात काही अर्थ नाही. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडिज गाड्या मिळाल्या की एक पद मिळतं. बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत होते तोपर्यंत त्यांचं सगळीकडे लक्ष होतं. नंतर अवनती होत गेली असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या होत्या. याबाबत शरद पवार यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.नीलम गोऱ्हे यांनी जे भाष्य साहित्य संमेलनात केलं त्याची काही आवश्यकता नव्हती.

# एआय विविध क्षेत्रातील नोकऱ्या खाणार?

## इन्फोसिसच्या सहसंस्थापकांचं आश्चर्यकारक उत्तर

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) वेगाने विकसित होत आहे. माणसाची अनेक कामे एआयच्या मदतीने चुटकीसरशी होऊ लागली आहेत. त्यामुळे येत्या काही वर्षांत एआयमुळे अनेकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागतील.**



अशी भिती सर्वांनाच सतावतेय. दरम्यान, इन्फोसिसचे सह-संस्थापक व चेअरमन नंदन निलेकणी यांनी एआयबद्दल एक महत्त्वाचं वक्तव्य करून लोकांमधील एआयची भिती दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. “एआय कितीही उपयुक्त असलं तरी अनेक मानवी गुणांना पर्याय नाही”,असं त्यांनी म्हटलं आहे.ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशनच्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, “सहानुभूती, नेतृत्व, सहकार्य व सर्जनशीलता हे मानवी गुण नेहमीच महत्त्वाचे राहतील. एआय या गुणांची जागा घेऊ शकत नाही. एआय जगात कितीही विकसित झालं तरी पाच जणांना एकत्र करून काम पूर्ण करता येत नसेल तर एआय मानवावर मात करू शकणार नाही”.नंदन निलेकणी म्हणाले, “लोकांनी अशा क्षमतांकडे लक्ष दिलं पाहिजे ज्या काळ पुढे सरकला तरी त्या तशाच राहिल्या पाहिजेत आणि त्या एआयमुळे प्रभावित होऊ नयेत. फर्स्ट-प्रिन्सिपल थिंकिंग हे एक महत्त्वाचं कौशल्य आहे. एआय हे मेकॅनिकल विचारावर आधारित आहे. परंतु, एआयमध्ये मूलभूतपणे एखाद्या गोष्टीचं विश्लेषण करण्याची आणि ते समजून घेण्याची क्षमता नाही”. मनी कंट्रोलने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे.दरम्यान, निलेकणी यांनी मान्य केलं आहे की एआयमुळे काही लोकांच्या नोकऱ्या जातील.

### काही नोकऱ्या निर्माण होतील

अनेक क्षेत्रांमधील रोजगाराच्या संधी कमी होतील. अनेक कामं ऑटोमेटेड होतील. परंतु, या बदलाकडे आपण सकारात्मकपणे पाहायला हवं असंही त्यांनी नमूद केलं. ते म्हणाले, “नक्कीच काही नोकऱ्यांवर एआयचा परिणाम होईल. काही कामं स्वयंचलित होतील. फार कमी क्षेत्रांमधील नोकऱ्या पूर्णपणे नष्ट होतील. एआय मानवाची उत्पादकता वाढवेल त्याचप्रमाणे काही नव्या संधी निर्माण करेल. आपण ज्याचा विचारही केला नसेल अशा काही नोकऱ्या एआयमुळे निर्माण होतील.

# अमिताभच्या पत्नीची भूमिका साकारण्यास तब्बूने दिला नकार

वयाच्या १४ व्या वर्षी ‘हम नौजवान’ या चित्रपटातून तब्बू(TABU)ने चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. ‘अंधाधून’, ‘फिलहाल’, ‘माचिस’, ‘चांदनी बार, दृश्यम, गोलमाल अगेन, विजयपथ, विरासत अशा अनेक चित्रपटात अभिनेत्रीने काम करत तिच्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. अनेक नायकांबरोबर काम केले आहे. मात्र, २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या बागबान या चित्रपटात तिने अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम करण्यास नकार दिला होता. बागबान चित्रपटाचे दिग्दर्शक रवी चोप्रा यांच्या पत्नी रेनू चोप्रा यांनी याबद्दल खुलासा केला आहे.रेनू चोप्रा यांनी नुकतीच पिंकविलाला मुलाखत दिली. या मुलाखतीत रेनू चोप्रा यांनी बागबान चित्रपटाची आठवण सांगताना म्हटले, “आम्ही तब्बूला कास्ट करण्याचा विचार करत होतो. तिने चित्रपटाची स्क्रीप्ट सांगण्यासाठी आग्रह केला. ती स्क्रीप्ट ऐकताना रडत होती. तिला चित्रपटाची स्क्रीप्ट आवडली होती. त्यामुळे ती या चित्रपटात काम करण्यासाठी होकार देईल, असा मी विचार करत होते. माझ्याशेजारी कोणीतरी बसले होते आणि त्या व्यक्तीने मला सांगितले की जेव्हा स्क्रीप्ट ऐकताना तब्बू रडते, तेव्हा ती चित्रपटात काम करत नाही.





त्यानंतर मी तब्बूला विचारलं की तू चित्रपटात काम करणार नाहीस का? त्यावर तिने मला म्हटले की मला ही गोष्ट खूप आवडली आहे. पण, मी चार मुलांच्या आईची भूमिका साकारू शकत नाही. माझे संपूर्ण करिअर माझ्यासमोर आहे. रवीजी मला माफ करा”, असे म्हणत तब्बूने शांतपणे या चित्रपटाला नकार दिल्याची आठवण रेनू चोप्रा यांनी सांगितली. त्यानंतर ही भूमिका हेमा मालिनी साकारली. जेव्हा तब्बूला या भूमिकेसाठी विचारणा करण्यात आली होती, त्यावेळी ती ३६ वर्षांची होती, तर अमिताभ बच्चन ६५ वर्षांचे होते. तब्बूने भूमिका नाकारल्यानंतर बागबान चित्रपटातील भूमिका हेमा मालिनी यांनी साकारली. याच्या दोन वर्षांनंतर हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्यावेळी तब्बू हैद्राबादमध्ये होती. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अभिनेत्री तीच्या काका-काकूसह चित्रपट पाहण्यास गेली. त्यावेळी तिने तिच्या काकूला सांगितले की या भूमिकेसाठी विचारणा झाली होती, पण मी ही भूमिका साकारण्यास नकार दिला. यावेळी तिला तिच्या काकूने या भूमिकेला नकार दिल्याबद्दल ओरडले होते. दरम्यान, बागबान हा चित्रपट रवी चोप्रा यांनी दिग्दर्शित केला असून याची पटकथा व निर्मिती बी.आर. चोप्रा यांनी केली आहे. या चित्रपटाला मोठे यश मिळाले होते. याबरोबरच, तब्बूने बागबान या चित्रपटात जरी अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम केले नसले तरी आर बल्की दिग्दर्शित चीनी कुम या चित्रपटात अमिताभ बच्चन यांच्याबरोबर प्रमुख भूमिकेत काम केले होते.

## अक्षयने ‘महाकुंभ मेळ्यात केलं पवित्र स्नान

उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेला महाकुंभ मेळा संपण्यासाठी अवघे काही दिवस बाकी राहिले आहेत. १३ जानेवारीपासून सुरू झालेला महाकुंभ मेळा २६ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. त्यामुळे भाविकांसह सेलिब्रिटी महाकुंभ मेळ्याला भेट देताना दिसत आहेत. १४४ वर्षांनी आलेल्या या कुंभ मेळ्यात आतापर्यंत कोट्यवधी भाविकांनी पवित्र स्नान केलं. नुकताच बॉलीवूडचा खिलाडी कुमार म्हणजे अक्षय कुमार महाकुंभ मेळ्यात सामिल झाला आणि त्याने पवित्र स्नान केलं. २०२५मधील सर्वात मोठा उत्सव महाकुंभ मेळा आहे. १४४ वर्षांनी महाकुंभ मेळा आल्यामुळे देश आणि विदेशातील लोक पवित्र स्नान करण्यासाठी पोहोचले आहेत. अक्षय कुमारदेखील प्रयागराजमध्ये पोहोचला. त्याने त्रिवेणी संगमने पवित्र स्नान केलं. यावेळी अभिनेत्याला पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. याचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत.अभिनेता अक्षय कुमार २४ फेब्रुवारीला सकाळी महाकुंभ मेळ्यात पोहोचला. यावेळी त्याचा साधा-सरळ अंदाज पाहायला मिळाला. चाहत्यांच्या मोठ्या गर्दीतून अक्षय कसाबसा घाटापर्यंत पोहोचला. त्यानंतर सर्वसामान्यांबरोबर अक्षयने पवित्र स्नान केलं. यावेळी अक्षयबरोबर आयपीएस ऑफिसर विश्वास नांगरे पाटील होते.‘एएनआय’ वृत्तसंस्थेशी संवाद साधताना अक्षय कुमार म्हणाला, “खूप मस्त वाटलं. खूप छान नियोजन केलं आहे. त्यामुळे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे आभार मानतो. मला अजूनही आठवत २०१९मध्ये कुंभ मेळा झाला होता. तेव्हा लोक खूप सामान वगैरे घेऊन यायचे. आता या महाकुंभ मेळ्यात मोठमोठी लोक, सेलिब्रिटी येते आहेत. हे पाहूनच कळतं असेल कशा प्रकारे नियोजन केलं आहे. हे खूप चांगलं आहे.



## जावेद अख्तर यांनी केलं विराटचं कौतुक

भारत विरुद्ध पाकिस्तानचा क्रिकेट सामना दुबईत रविवारी पार पडला. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. मात्र भारतीय गोलंदाजांच्या भेदक माऱ्यापुढे त्यांना ५० षटकांत २४१ धावच करता आल्या. विजयासाठी अवघ्या २४२ धावांचं लक्ष्य होतं. जे भारतीय संघाने सहा गडी राखत गाठलं. विराट कोहलीने केलेली शतकी खेळी ही महत्त्वाची ठरली. त्यामुळे विराट कोहलीचं कौतुक होतं आहे. जावेद अख्तर यांनीही विराट कोहलीचं कौतुक केलं. ज्यानंतर त्यांना एका युजरने टोमणा मारला. या टोमण्यानंतर जावेद अख्तर यांनीही त्याला तिखट प्रत्युत्तर दिलं. जाणून घेऊ नेमकं काय घडलं?सामना संपल्यानंतर कवी आणि गीतकार जावेद अख्तर यांनी विराट कोलहीचं कौतुक केलं.

## ‘छावा’वर शिर्केंच्या वंशजांचा आक्षेप

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित ‘छावा’ची सध्या संपूर्ण देशभरात चर्चा होत आहे. मात्र, यादरम्यान राजेशिर्के घराण्याच्या वंशजांनी इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप करत ‘छावा’ सिनेमावर आक्षेप घेतला होता. कोणताही ऐतिहासिक पुरावा नसताना राजेशिर्केंची बदनामी केली, याचा जाहीर निषेध करत अब्रूनुकसानीचा १०० कोटींचा दावा ठोकणार असं शिर्के यांचे वारसदार पत्रकार परिषदेत म्हणाले होते. यावर आता दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी प्रतिक्रिया देत माफी मागितली आहे. याशिवाय त्यांनी सविस्तर स्पष्टीकरण देत स्वत:ची बाजू देखील मांडलेली आहे. लक्ष्मण उतेकर एबीपी माझाशी ऑडिओ क्लिपद्वारे संवाद साधताना म्हणाले, “आदरणीय भूषणजी (महाराणी येसूबाईंचे वंशज) सर्वात आधी तुमचा फोन मी नेटवर्क नसल्याने उचलू शकलो नाही... त्यासाठी सॉरी. पण, तुमची पत्रकार परिषद मी पाहिली आणि तुमचा मेसेजही वाचलाय.

## माधुरीच्या दिलखेचक अदा!

९० च्या दशकात रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी सुपरस्टार अभिनेत्री म्हणून माधुरी दीक्षितला ओळखलं जातं. मराठमोळ्या ‘धकधक गर्ल’चे चाहते केवळ भारतातच नाहीतर जगभरात आहेत. माधुरी सुंदर अभिनेत्री आहेच पण, याशिवाय इंडस्ट्रीत तिला उत्तम नृत्यांगणा म्हणून देखील ओळखलं जातं. आजवर अनेक चित्रपटांमध्ये माधुरीने डान्स फेस ऑफचे दमदार सीन्स केले आहेत. ‘दिल तो पागल है’ ( माधुरी-करिश्मा ), देवदास ( माधुरी -ऐश्वर्या ), भूल भुलैय्या ( माधुरी-विद्या बालन ) या तिन्ही चित्रपटांमधली माधुरीची डान्स जुगलबंदी सोशल मीडियावर तुफान हिट ठरलीये. आजही व्यग्र शेड्युमधून वेळ मिळाला की, माधुरी आपल्या डान्सची आवड जोपासताना दिसते. अलीकडेच ‘धकधक गर्ल’ने शेअर केलेला एक डान्स व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे.



## कतरिनाने सासूबाईंसह गाठलं प्रयागराज

महाकुंभमेळ्याचा समारोप महाशिवरात्रीला होणार आहे. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्री आहे. याच दिवशी महाकुंभमेळ्यातील शेवटचं शाही स्नान पार पडेल. याच पार्श्वभूमीवर आज बरेच सेलिब्रिटी प्रयागराजला पोहोचल्याचं पाहायला मिळत आहे. ‘छावा’ सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वी विकी कौशलने महाकुंभमेळ्यात पवित्र स्नान केलं होतं. आता त्याच्या पाठोपाठ अभिनेत्याची पत्नी कतरिना कैफ आणि त्याची आई या दोघीही प्रयागराजला पोहोचल्याचं पाहायला मिळत आहे. सोमवारी ( २४ फेब्रुवारी ) कतरिना फिकट गुलाबी रंगाचा ड्रेस घालून महाकुंभमेळ्यात पोहोचली होती. यावेळी तिच्या सासूबाई वीणा कौशल सुद्धा उपस्थित होत्या. साध्या अन् पारंपरिक लूकमध्ये कतरिना अतिशय सुंदर दिसत होती. यावेळी सर्वप्रथम तिने गुरू स्वामी चिदानंद स्वामी आणि साध्वी भगवती यांचे आशीर्वाद घेतले. कतरिनाने मीडियाशी संवाद साधताना आजचा पूर्ण दिवस प्रयागराजमध्ये वास्तव्य करणार असं सांगितलं आहे. महाकुंभमेळ्याला गेल्यावर कतरिनाने सर्वात आधी परमार्थ निकेतन आश्रमाचे आध्यात्मिक प्रमुख स्वामी चिदानंद सरस्वती यांचं दर्शन घेतलं. यावेळी अभिनेत्री म्हणाली, “मी खूप भाग्यवान आहे की, मी यावेळी इथे येऊ शकले. मी खरोखर आनंदी आणि कृतज्ञ आहे. आम्ही स्वामी चिदानंद सरस्वतींना भेटलो आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. मला या जागेची ऊर्जा, याचं सौंदर्य आवडतं. मी संपूर्ण दिवस येथे घालवण्यास उत्सुक आहे.”कतरिना सासूबाईंबरोबर महाकुंभमेळ्याला पोहोचल्याने नेटकऱ्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. भर गर्दीत ती सासूबाईंना सांभाळताना दिसली.



# रचिन रवींद्रचा शतकासह वर्ल्ड रेकॉर्ड!

## रचिन अवघ्या 105 चेंडूत 112 धावा करून बाद झाला

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**न्यूझीलंड संघाचा स्टार फलंदाज रचिन रवींद्रने दुखापतीतून शानदार पुनरागमन करत चॅम्पियन्स ट्रॉफीमधील पहिल्याच सामन्यात धुमाकूळ घातला. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये रचिन रवींद्रने बांगलादेशविरुद्ध शानदार शतक झळकावून रेकॉर्ड बुकमध्ये आपले नाव नोंदवले. आयसीसी स्पर्धेपूर्वी लाहोरमध्ये झालेल्या तिरंगी मालिकेच्या पहिल्या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना दुखापतीमुळे न्यूझीलंडच्या शेवटच्या तीन सामन्यांमधून तो बाहेर पडला होता. पण त्याने दणक्यात पुनरागमन करत वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला.**

चॅम्पियन्स ट्रॉफीतील बांगलादेशविरूद्ध सामन्यात आजारपणामुळे बाहेर पडलेल्या डॅरिल मिचेलच्या जागी रचिनने प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळवले. न्यूझीलंडने धावांचा पाठलाग करताना खराब सुरुवात केल्यानंतर २५ वर्षीय रचिन चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि त्याने डेव्हॉन कॉन्वेच्या मदतीने संघाचा डाव सावरला.डेव्हॉन कॉन्वेसह तिसऱ्या विकेटसाठी ५७ धावांची भक्कम भागीदारी करून रचिनने न्यूझीलंडला लक्ष्य गाठण्यास मदत केली. नंतर टॉम लॅथम आणि रचिन यांनी चौथ्या विकेटसाठी १२९ धावांची भागीदारी केली. दरम्यान रचिन अवघ्या १०५ चेंडूत ११२ धावा करून बाद झाला, तर लॅथमने ७६ चेंडूत ५५ धावा करून संघासाठी सहज विजयाचा टप्पा निश्चित केला. या विजयासह न्यूझीलंडने भारतासह उपांत्य फेरीत प्रवेश केला.रवींद्रच्या शतकाने त्याने आपलं नाव इतिहासाच्या पुस्तकात नोंदवले. क्रिकेट विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफी या दोन्ही सामन्यांमध्ये पदार्पणात शतक झळकावणारा तो इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे. या युवा खेळाडूने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर २०२३ विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध शतक झळकावले होते. यानंतर आता चॅम्पियन्स ट्रॉफीतील पहिल्या सामन्यात त्याने शतक झळकावत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली.क्रिकेटच्या इतिहासात, १९ खेळाडूंनी एकदिवसीय विश्वचषकात पदार्पणात शतक झळकावले आहे आणि १५ खेळाडूंनी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पदार्पणातच शतक केले आहे. पण पदार्पणात शतक झळकावणारा रचिन हा दोन्ही यादीतील जगातील एकमेव खेळाडू आहे.एकदिवसीय क्रिकेटमधील अवघ्या ३० डावांमध्ये रचिनचे हे चौथे शतक होते आणि चारही शतके आयसीसी स्पर्धांमध्ये त्याने केली आहेत. या स्टार फलंदाजाने २०२३ च्या क्रिकेट विश्वचषकात तीन शतकं झळकावली. रचिन आता आयसीसी स्पर्धांमध्ये न्यूझीलंडकडून सर्वाधिक शतकं करणारा खेळाडू बनला आहे. त्याच्याआधी केन विल्यमसन आणि नॅथन ॲस्टल यांनी प्रत्येकी तीन शतकं झळकावली होती. आयसीसी स्पर्धेच्या इतिहासात सर्वात जलद चार शतकं करणारा




### लॅथमने विजयाचा टप्पा निश्चित केला

नंतर टॉम लॅथम आणि रचिन यांनी चौथ्या विकेटसाठी १२९ धावांची भागीदारी केली. दरम्यान रचिन अवघ्या १०५ चेंडूत ११२ धावा करून बाद झाला, तर लॅथमने ७६ चेंडूत ५५ धावा करून संघासाठी सहज विजयाचा टप्पा निश्चित केला. या विजयासह न्यूझीलंडने भारतासह उपांत्य फेरीत प्रवेश केला. रवींद्रच्या शतकाने त्याने आपलं नाव इतिहासाच्या पुस्तकात नोंदवले. क्रिकेट विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफी या दोन्ही सामन्यांमध्ये पदार्पणात शतक झळकावणारा तो इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे. या युवा खेळाडूने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर २०२३ विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध शतक झळकावले होते.

रचिन हा भारताच्या शिखर धवननंतरचा दुसरा खेळाडू आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीतील बांगलादेशविरूद्ध सामन्यात आजारपणामुळे बाहेर मिचेलच्या जागी रचिनने प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळवले. खराब सुरुवात केल्यानंतर २५ वर्षीय रचिन चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि त्याने डेव्हॉन कॉन्वेच्या मदतीने संघाचा डाव सावरला.डेव्हॉन कॉन्वेसह तिसऱ्या विकेटसाठी ५७ धावांची भक्कम भागीदारी करून रचिनने न्यूझीलंडला लक्ष्य गाठण्यास मदत केली.

# युपी वॉरियर्जचा सुपर ओव्हरमध्ये थरारक विजय

## थरारक सामन्यात आरसीबीचा त्यांच्या घरच्या मैदानावरच पराभव

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**युपी वॉरियर्जचा संघ वुमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासातील पहिल्याच सुपर ओव्हरमध्ये विजयी ठरणारा पहिला संघ ठरला आहे. युपीच्या संघाने सुपर ओव्हरच्या थरारक सामन्यात आरसीबीचा त्यांच्या घरच्या मैदानावरच पराभव केला आहे. युपी वॉरियर्जच्या या ऐतिहासिक विजयाची स्टार सॉफी एकलस्टन ठरली आहे. जी टी-२० आणि वनडेमधील जगातील पहिल्या क्रमांकाची गोलंदाज आहे. सॉफी एकलस्टनने या सामन्यात फक्त गोलंदाजी नाही तर फलंदाजीतही उत्कृष्ट कामगिरी केली.**




आरसीबी वि. युपी वॉरियर्ज यांच्या सामन्यात वुमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासातील पहिली सुपर ओव्हर खेळवण्यात आली. यासह या सामन्यात संघाने विजय मिळवला आहे. सुपर ओव्हरमध्ये युपी वॉरियर्जकडून चिनेल हेनरी आणि ग्रेस हॅरिसची जोडी मैदानात आली होती, तर आरसीबीकडून किम गार्थच्या हातात चेंडू होता. पहिल्या दोन चेंडूवर हेनरीने मोठे फटके खेळण्याचा प्रयत्न केला पण दोन्ही चेंडूंवर २-२ धावा मिळाल्या. यानंतर एक वाईड चेंडू तर तिसऱ्या चेंडूवर हेनरी झेलबाद झाली. यानंतर डॉट बॉल पुन्हा एक वाईड चेंडू आणि अखेरच्या चेंडूवर एक धाव घेत युपीने एकूण ८ धावा केल्या. यासह आरसीबीला विजयासाठी एका षटकात ९ धावांचे योगदान दिले.आरसीबीचा संघ ९ धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करण्यात अपयशी ठरला. आरसीबीकडून कर्णधार स्मृती मानधना आणि रिचा घोषची जोडी मैदानात उतरली होती. तर युपीकडून पांढ्या चेंडूची जगातील नंबर वन गोलंदाज सोफी एकलस्टन गोलंदाजी करत होती. सोफीच्या भेदक गोलंदाजीच्या पुढे आरसीबीच्या दोन्ही फलंदाज फेल ठरल्या. आरसीबीचा संघ फक्त ४ धावा करू शकला. यासह युपीने दणदणीत विजय मिळवला. आरसीबी वि. युपी वॉरियर्जच्या सामन्यातील अखेरच्या षटकात युपीला विजयासाठी ६ चेंडूत १८ धावांची गरज होती तर आरसीबीला विजयासाठी एका विकेटची गरज होती. चेंडू अनुभवी रेणुका ठाकूरच्या हातात चेंडू होता. तर युपीकडून सोफी एकलस्टनने या सामन्यात दोन षटकार आणि एक चौकार लगावत १६ धावा केल्या. तर पाचव्या चेंडूवर १ धाव घेतली आणि अखेरच्या चेंडूवर एकलस्टन धावबाद झाली. यासह सामना बरोबरीत सुटला आणि WPL च्या इतिहासातील पहिली सुपर ओव्हर खेळवण्यात आली.यूपी वॉरियर्जने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण एलिस पेरीने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी अप्रतिम खेळी खेळली, ज्यामुळे आरसीबी संघाने २० षटकांत ६ गडी गमावून १८० धावा केल्या. पेरीने ५६ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ९० धावा केल्या. तिच्याशिवाय डॅनी व्याटनेही ५७ धावांचे योगदान दिले. पेरीने डॅनी व्याटसह अर्धशतकी भागीदारीही केली.

### एकलस्टनने नाबाद 33 धावा केल्या

दुसरीकडे, यूपी वॉरियर्जला देखील २० षटकांत केवळ १८० धावा करता आल्या आणि संघ अखेरच्या षटकातील अखेरच्या चेंडूवर सर्वबाद झाले. यादरम्यान श्वेता सेहरावतने ३१ धावा, दीप्ती शर्माने २५ धावा आणि सोफी एकलस्टनने नाबाद ३३ धावा केल्या. शेवटच्या षटकात यूपीला विजयासाठी १८ धावांची गरज होती. या षटकात सोफी एकलस्टनने २ षटकार आणि १ चौकार मारून सामना रोमांचक वळणावर आणला. पण शेवटच्या चेंडूवर संघाला विजयासाठी १ धाव हवी होती आणि क्रांती गौर स्ट्राईकवर होती. ती हा चेंडू खेळण्यासाठी चुकली आणि सोफी एकलस्टन धावबाद झाली, त्यामुळे सामना बरोबरीत सुटला.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

## भविष्यातील कचरा समस्या लक्षात घेऊन

# प्रत्येक प्रभागात कंपोस्ट प्लांट उभारा!

### तुषार कामठे : कचरा समस्येवर मात करण्यासाठी मागणी

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी मोशी येथे कचरा डेपो उभारण्यात आला आहे. संपूर्ण शहराचा कचरा या डेपोमध्ये टाकला जातो. पालिकेने पुनावळे या भागामध्ये नव्या कचरा डेपोसाठी हालचाली सुरू केल्या. मात्र येथील प्रचंड नागरीकरण, नियोजित डेपोच्या जागी असलेली दाट वनराई यामुळे नागरिक तसेच पर्यावरण प्रेमींनी येथे कचरा डेपोसाठी विरोध केल्यानंतर हा डेपो कागदावरच आहे त्यामुळे भविष्यातील कचरा समस्या लक्षात घेऊन शहरातील प्रत्येक प्रभागात स्वतंत्र कंपोस्ट प्लांट उभारण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी केली आहे.**



पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना याबाबत तुषार कामटे यांनी निवेदन दिले आहे तसेच त्यांनी याबाबत पत्राद्वारे मुख्यमंत्री तसेच पर्यावरण मंत्र्यांनाही या मागणीबाबत कळविले आहे.

तुषार कामठे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. पिंपरी-चिंचवड शहर दिवसेंदिवस झपाट्याने वाढत चालले आहे. वाढत्या नागरिकरणामुळे शहरातील कचऱ्याची समस्या गंभीर होत चालली आहे. मोशी येथील कचरा डेपोत कचऱ्याचे डोंगर उभे आहेत. तेथे तब्बल ३० वर्षांपासूनचा कचरा साचला आहे. वाढत्या शहरासाठी मोशी या एकाच ठिकाणी कचरा जमा न करता पुनावळे येथे कचरा डेपो निर्माण करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. मात्र, पुनावळे येथे कचरा डेपो उभा राहिल्यास तेथील नागरी वस्तीस व बाजूला असलेल्या आयटी कंपन्यांना याचा नाहक त्रास सहन करावा लागेल. तसंच येथील २२ हेक्टर जागेमध्ये हजारो वृक्ष उभे असून या नवीन कचरा डेपोच्या निर्मितीसाठी या झाडांची वृक्षतोड केली जाईल. तसंच कचरा डेपोमध्ये वारंवार लागणाऱ्या अग्नीमुळे हवा प्रदूषण व हानीचा धोका देखील निर्माण होऊ शकतो. मागील हिवाळी अधिवेशनात मंत्री उदय सामंत यांनी पुनावळे येथील कचरा डेपोवर स्थगिती आणली होती. मात्र, काही दिवसांपूर्वी पालिकेच्या आयुक्तांनी याबाबतचा शासकीय अध्यादेश आम्हाला प्राप्त झाला नसल्याचे म्हटले आहे. यावर सात दिवस उपोषण आंदोलन करूनही समाधानकारक उत्तर पालिका प्रशासनाकडून मिळाले नाही. यामुळे ही बाब गांभीर्याने घेऊन फक्त पुनावळे येथेच हा कचरा डेपो न बनवता पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक प्रभागात कंपोस्ट प्लांट उभारला तर शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सुलभरित्या करता येऊ शकेल. यामुळे होणारे कोट्यावधी रुपयांचे पालिकेचे नुकसान वाचून शहरात कचरा व्यवस्थापन नागरिकांमार्फत केले जाईल, असेही कामठे यांनी म्हटले आहे.

> पुनावळे येथील कचरा डेपो रद्द झाल्याचे सांगण्यात आले. मात्र प्रशासन यासाठी कोणताही शासकीय अध्यादेश उपलब्ध झाला नसल्याचे सांगत असल्यामुळे संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे प्रत्येक प्रभागात स्वतंत्र कंपोस्ट प्लांट उभारावा अशी मागणी केली आहे. यामुळे पालिकेमार्फत करण्यात येणारा कचरा वाहतूकीचा खर्च देखील वाचू शकतो. याचा फायदा भविष्यात शहराच्या विकासाला होऊ शकतो, त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक प्रभागात स्वतंत्र कंपोस्ट प्लांट उभारणेबाबत आपण योग्य ती कार्यवाही करून अधिकाऱ्यांना सूचना द्याव्या देण्याची मागणी केली आहे.
> – **तुषार कामठे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

## दीड हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रंगला "क्रीडारंभ २०२५"

### शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड विद्यापीठामध्ये क्रीडारंभ महोत्सवाचा समारोप

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी चिंचवड विद्यापीठ साते, वडगाव मावळ येथील प्रांगणात "क्रीडारंभ २०२५" या तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचा यशस्वी समारोप करण्यात आला.**




क्रीडारंभचे उद्घाटन क्रिकेटपटू रोहित मोटवानी याच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, क्रीडा समितीच्या अध्यक्षा डॉ. प्रोतिभा नाथ बॅनर्जी, डॉ. अमित पाटील, डॉ. वी एन पाटील, डॉ. रामदास बिरादार, मकबूल खान, डॉ. अंजू बाला, डॉ. राजकमल उपाध्याय आदींसह विविध विभागाचे प्रमुख, प्राध्यापक व सहभागी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रिकेट, फूटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी या सांघिक खेळांबरोबरच कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस या वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आले यामध्ये दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना व संघांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

कौस्तुभ भोसले या विद्यार्थ्याने दिल्ली येथे झालेल्या १९ व्या आशियाई क्रीडा स्पर्धा मध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल सत्कार करण्यात आला. क्रीडारंभ २०२५ चे आयोजन कुलपती हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.


r of Sustainable
d Waste Water Treatment Solution Globally


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School
& Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI